# इन्व्हेस्टर अॅलर्ट !



**एक्सचेंजच्या व्यापार व्यवस्थेबाहेरील रोखे व्यापारात व्यवहार करणाऱ्या व्यक्तिसोबत आपण सौदा करता का ?**

असे काही दुराचारी घटक मान्यताप्राप्त स्टॉक एक्सचेंजच्या प्रस्थापित व्यापार व्यवस्थेबाहेरील शेअर्सच्या व्यवहारात कार्यरत असल्याची माहिती आहे. असे घटक स्पष्टपणे एनएसई सारख्या प्रमुख एक्सचेंजकडून ऑन–लाईन संदर्भीय किंमतीनुसार शेअर्सच्या किंमतीचा वापर करतात. अशा प्रकारच्या व्यवहाराचे हिशोब व समेट ते बहुतेकदा रोख तत्वावर अनधिकृतपणे ठेवतात. असे उद्योग अनधिकृतपणे चाललेल्या रचनेसोबत देखील एकत्रितपणे सुरू असतात.

एनएसईच्या व्यापार सदस्यांपैकी कुणी किंवा त्यांचे नोंदणीकृत सह–दलाल हे जर अशा प्रकारचे उद्योग करीत असतील तर ते एनएसईचे नियम, अटी व कायद्यांचे गंभीर उल्लंघन करीत असल्याचे समजण्यात येईल ज्याकरीता एनएसईकडून त्यांच्या विरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.



**अशा बेकायदेशीर व्यापारापासून स्वतःचे संरक्षण करण्याची गरज तुम्हाला का आहे ?**

बाजारामध्ये गुंतवणूक करण्यासाठी गुंतवणूकदार ज्या संरचनेचे पालन करतो तिचा एक्सचेंजशी संबंध असतो. जे गुंतवणूकदार अशा प्रकारच्या एक्सचेंजबाहेरील व्यवस्थेत सहभागी होतील त्यांना अशा प्रकारच्या व्यवस्थेतील व्यवहारात कोणत्याही प्रकारची वादग्रस्त परिस्थिती उद्भवल्यास एनएसईकडून वादग्रस्त ठरावावरील समाधान तोडगा, मध्यस्थीची सुविधा व गुंतवणूकदार संरक्षण निधी इत्यादीचा लाभ मिळणार नाही.

## योग्य गुंतवणूक करा, सुरक्षित गुंतवणूक करा आणि उत्तमप्रकारे आपली वस्तुस्थिती ओळखा



- रोख्यांची खरेदी व विक्री फक्त सेबी अंतर्गत नोंदणीकृत ब्रोकर (दलाल) किंवा त्यांच्या नोंदणीकृत सब–ब्रोकर (सहदलाल) कडून करा. त्यानी त्यांचे सेबीची नोंदणी असलेले प्रमाणपत्र त्यांच्या व्यापाराची सुविधा असलेल्या प्रत्येक जागी दर्शनीय ठिकाणी लावणे आवश्यक आहे.
- मेंबर कॉन्स्टिट्युट अँग्रिमेंट अंमलात आणा आणि त्याची स्वाक्षरी असलेली प्रत तुमच्या दलालाकून मिळवा.
- याची खात्री करून घ्या की, तुम्हाला तुमच्या ब्रोकरकडून तुमच्या व्यवहाराची एक करारप्रत पूर्णतः भरून 24 तासांच्या आत मिळायला हवी. या व्यतिरीक्त एनएसईच्या ट्रेड व्हेरिफिकेशन फॅसिलिटी (व्यापार शाबिती सुविधा) द्वारे एनएसई वेबसाईट www.nseindia.com/content/equities/eq_trdverify.htm वर तुम्ही तुमच्या व्यवहाराच्या सत्यतेबाबत उलट तपासणी सुध्दा करू शकता. व्यवहाराच्या तारखेपासून 5 कार्यकालीन दिवसांपर्यंत माहिती उपलब्ध आहे.



- तुमच्या क्रमागत समेटासाठीचे तुमचे पैसे/शेअर्स तुम्हाला एनएसईच्या कामकाज दिवसातील दुसऱ्या दिवशी ठरविलेल्या तारखेस परत मिळतील याची खात्री करून घ्या.
- तुमचे शेअर्स फक्त तुमच्या सेबी नोंदणीकृत ब्रोकरकडे/कडून भरा/स्विकारा.
- मार्जिन आणि समेटाप्रित्यर्थ मिळणाऱ्या सर्व पेमेंटची स्विकृती/भरणा तुमच्या सेबी नोंदणीकृत ब्रोकरकडे/कडून फक्त–अकाऊंट पेयी चेक/डिमांड ड्राफ्टद्वारे करा.

ही मार्गदर्शक सूची तुमच्या फायद्यासाठी आहे. तिचे पालन करा.

**नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड**

''एक्सचेंज प्लाझा'', बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई–400 051.

फोन : 91-22-26598100-8114. फॅक्स : 91-22-26598120. ई–मेल : cc_nse@nse.co.in

कृपया आम्हाला भेटा आमच्या वेबसाइटवर www.nseindia.com जनहितार्थ एनएसई द्वारा प्रकाशित.

A B and U - ia